प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. २८/०५/२०१८

## दत्तवाडी पोलीसांनी घरफोडीतील आरोपीला केले जेरबंद

दिं. २७/०५/२०१८ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो शि ८३६१ विकास कदम व पो शि ८७१० सागर सुतकर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "एक इसम हा एका गोणीत त्याचेकडे असणारे पितळाची समई व पितळाची घंटा ही विकण्यासाठी घेवुन राजाराम पुल चौक येथे आला असन, त्याचेजवळील गोणीत असणारी पितळाची समई व पितळाची घंटा ही चोरीचीच असावी" अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पो. शि. कदम, पो. शि. सुतकर यांनी ती बातमी पोलीस उपनिरिक्षक डफळ यांना कळविली. त्याप्रमाणे त्यांनी ती बातमी वरिष्ठ पोलीस निरिक्षक सो यांना कळविली असता त्यांनी कारवाईबाबत मार्गदर्शन करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणेस सांगीतलेने, पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ व पोलीस उपनिरिक्षक कलदिप संकपाळ हे लागलीच स्टाफसह खाजगी वाहनाने तत्काळ राजाराम पुल चौक येथे गेले असता, तेथे व्यंकीज हाऊसच्या पुढे वरील वर्णणाचा एक इसम हा एक अर्धी भरलेली गोणी घेवुन थांबलेला असल्याचे आम्हास दिसले त्यावेळी बातमीप्रमाणे आमची व पंचांची खात्री होताच आम्ही त्याला वरील स्टाफचे मदतीने १७/३० वा. जागीच पकडले व त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव कृष्णा ज्ञानोबा मोरताटे वय २० वर्षे धंदा. मजुरी रा. चरवड वस्ती, शांताईनगर, पाण्याच्या टाकीजवळ, वडगाव बद्रुक पुणे असे असल्याचे सांगीतले त्यावेळी त्याचेकडे असणारी अर्धवट भरलेली गोणी उघडुन पाहता त्यामध्ये एक पितळाची समई व एक पितळाची घंटा ही मिळुन आली त्यावेळी सदर इसमास आम्ही हे कोठुन आणले आहे व कोणाचे आहे याबाबत विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने आम्हास त्याचेकडे असणारे गोणीतील पितळाची समई व पितळाची घंटा हे चोरीचेच असावेत याबाबत खात्री झाली म्हणुन आम्ही त्यास गोणीतील पितळाची समई व पितळाची घंटा यांचेसह ताब्यात घेवुन पंचासह दत्तवाडी पोलीस ठाणे येथे आणुन त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे सदर पितळाची समई व पितळाची घंटा कोठुन आणली याचेबाबत तपास केला असता त्याने सदर पितळाची समई व पितळाची घंटा ही तो व त्याचे मित्र नामे सागर जाधव, महादेव ऊर्फ दादा शिंदे असे मिळुन साधारणतः दोन महीन्यापुर्वी सिंहगड रोड शारदा मठासमोरील दत्तमंदीर रेणुकामाता मंदीर येथुन चोरलेले असल्याबाबत सांगीतल्याने त्यास अटक करुन मा.कोर्टात हजर केले असता, मा. कोर्टाने त्यास दि. ३१/०५/२०१८ रोजीपर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

विशेष म्हणजे अटक आरोपीचा दुसरा साथीदार सागर अशोक जाधव हा हा दोन दिवसापूर्वी दत्तवाडी पोलीसांनी अटक केला असन, तो सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहे. व दुसरा साथीदार महादेव ऊर्फ दादा शिंदे हा सध्या बारामती येथे असल्याची माहिती मिळाली आहे. आरोपनी इतर ठिकाणीही चोरी केल्या असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई ही मा. डॉ. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पो. हवा. तानाजी निकम, पो.हवा. रविंद्र फुलपगारे, पो.ना. सधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो शि. विकास कदम, पो. शि. सागर सुतकर, पो शि रोहन खैरे, व पो. शि. राहुल ओलेकर, पो शि शरद राऊत, पो शि शिवाजी क्षीरसागर, पो. शि. अमित बोडरे व पो. शि. अभिजीत कळसकर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.